**प्रेसनोट**

दिनांक १४/०१/२०२०

**आरोपी राजेंद्र नामदेव कांबळे, वय ४७ वर्षे, पद पोलीस हवालदार ब. नं. ३५२, पोलीस ठाणे औसा जि. लातूर रा. सदगुरु हारवदेव नगर लातूर ता. जि.लातूर यांनी तक्रारदार यांना ८०००/– रुपयांची लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे ऑनलाईन लॉटरी सेंटर चालु करु देण्यासाठी व त्याच्यावर कार्यवाही न करण्यासाठी तक्रारदार यांना पोलीस ठाणे औसा येथील बीट आमंलदार ८०००/– रुपये लाचेची मागणी करत असल्या बाबतची तक्रार दिनांक ११/०१/२०२० रोजी लाच लुचपत प्रतिबंध विभाग, लातूर. कार्यालय येथे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक १४/०१/२०२० रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, आरोपी पोलीस हवालदार राजेंद्र नामदेव कांबळे यांनी तक्रारदार यांचे ऑनलाईन लॉटरी सेंटर चालु करु देण्यासाठी व त्याच्यावर कार्यवाही न करण्यासाठी तक्रारदार यांना ८०००/– रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी आरोपी राजेंद्र नामदेव कांबळे, वय ४८ वर्षे, पद पोलीस हवालदार ब. नं. ३५२, पोलीस ठाणे औसा जि. लातूर यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दिनांक १४/०१/२०२० रोजी पोलीस ठाणे औसा येथे पाठविले असता आरोपी राजेंद्र नामदेव कांबळे यांनी तक्रारदार यांना ८०००/– रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम १७:४६ वाजता पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन औसा येथे कलम ७ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, पोह/संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना/चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, सचिन धारेकर, शैलेश सुडे, दत्ता विभुते, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील कमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड | :– मोबाईल कमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईल कमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईल कमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन कमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन कमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

( माणिक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातूर